MARATHI

अलहम्दोलिल्लाह वहदहू व वस्सलवतो वस्सलाम अलामिनल नबीबादा...

(केवळ अल्लाह प्रशंसेयोग्य आहे आणि सलामती हजरत मोहम्मद पैगंबरासाठी जे त्यांचे अंतिम प्रेषित आहेत.)

**मुस्लीम बांधवांनो! खबरदार! इस्लामविरूध्द आरंभलेल्या कटापासून सावधान!!**

मुसलमानांचा धर्म आणि आखरत (प्रलय काळ) यांचा विनाश करणाऱ्या, हेतुपुरस्सर त्यांची दिशाभूल करणाऱ्या सैतानी अहमदीया चळवळीपासून सावधान!!!

प्रिय इस्लामी बांधवांनो,
अस्सलामो अलैकूम!

तसं पाहिलं तर हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या आगमनापासून आजतागायत इस्लाम आणि जगातील सर्व मुसलमानांचा नायनाट करून पृथ्वीतलावरील त्यांचे अस्तित्वच नष्ट करण्यासाठी इस्लामविरोधी सैतानी शक्तींनी - विशेषत: मिशनरी चळवळी आणि अनेकविध तोतया प्रेषितांनी आपली डोकी वर काढल्याचे व आपल्या त्या दुष्ट हेतूंच्या पूर्तीसाठी भगिरथ प्रयत्न केल्याचे सर्वश्रुत आहे. मात्र प्रत्येक वेळी त्यांच्या त्या अपवित्र प्रयत्नांचा दारूण पराभवच झाला आणि अल्लाहच्या कृपेने इस्लाम धर्माचा अधिकाधिक प्रभाव वाढतच गेला - पराकोटीचे यश त्याला प्राप्त झाले. प्रत्येक वेळी त्या सैतानी चळवळी आणि तोतया प्रेषितांनी काळानुरूप बहुरूपया प्रमाणे आपले रूप बदलले - प्रसंगी वेषांतरही केले. तथापि त्यांचा मुलभूत हेतू नेहमी एकच राहिला. तो म्हणजे मुसलमान आणि इस्लाम यांचा नि:पात!

इस्लामच्या शिकवणीप्रमाणे मुसलमान हजरत इसा अलाह सलाम यांना अल्लाहचे खरे पैगंबर मानतात. खिस्तांनी मात्र हजरत मोहम्मद पैगंबर यांना कधीच अंतिम आणि सच्चा प्रेषित मानले नाही! त्यांनी हजरत मोहम्मद पैगंबर आणि इस्लाम यांच्या विरूध्द सलाहुद्दिन अय्यूबी यांच्या काळात होणाऱ्या धर्मयुध्दांपासून आजतागायत केवळ गरळच ओकण्याचे पाप केले आहे. त्याचप्रमाणे अशिक्षित अजाण मुस्लीम बांधवांची दिशाभूल करण्यासाठी अनेक चळवळी चालवल्या आहेत - इस्लाम धर्माला त्यायोगे शक्यतो जास्तीत जास्त हानी पोचविऱ्याचे महान पातक केले आहे! त्यांच्या या चळवळी इस्लामचा केवळ अस्वीकार करीत नाहीत तर त्यांच्या मूलभूत शिकवणींनाच आव्हान देत आहेत. इस्लामचे समूळ उच्चाटन करण्यासाठी ही मंडळी अगदी टपून बसल्यासारखी दिसतात. संधी मिळताच त्यांच्या मुळांना पोखरताना आढळतात.

गुलाम अहमद कादियानीची अहमदीया चळवळ ही सुध्दा त्याच दिशाभूल करणाऱ्या चळवळींपैकी एक आहे, जिला खिस्त राष्ट्रांचे पाठबळ आणि पालकत्व प्राप्त आहे. मुस्लीमांची दिशाभूल करणाऱ्या या सैतानी चळवळीचे अनुयायी गेल्या एका शतकापासून आपली ही खोडसाळ चळवळ निर्लज्जपणे पुढे रेटण्याचा प्रयत्न करीत आहेत.

प्रचलित काळातील मुसलमानाच्या धार्मिक उदासिनतेचा पुरेपूर लाभ उठवून सैतानाच्या या अनुयायांनी आपल्या या दुष्ट चळवळींचा वेग अधिकाधिक वाढवायला सुरूवात केली आहे. इंग्लंडमधील यांच्या मुख्य कचेरीकडून अहमदीया चळवळीच्या या कार्यकर्त्यांना प्रचंड प्रमाणात पैसा पुरवला जातो आहे. त्या पैशाच्या जोरावर दारिद्र्यात जगणाऱ्या भोळ्याभाबड्या मुसलमानांना इस्लामविरूध्द चिथावणी देत, त्यांची दिशाभूल करण्याचे प्रयत्न फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहेत. या अप्रचाराला पूरक अशी अनेक प्रक्षोभक पुस्तके आणि प्रचारसाहित्य नित्य प्रकाशित करून सर्वसामान्य मुसलमानांधे ते सर्रास वाटले जाऊ लागले आहे.. इस्लामचा समस्त चेहरामोहराच विद्रूप करता यावा म्हणून सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

बानगीदाखल खाली दिलेल्या कादियानी यांच्या विक्षिप्त श्रध्दा इस्लाम आणि मुसलमान यांच्या दृष्टीने किती धोकादायक आणि हानिकारक आहे हे कोणाही सश्रध्द, संवेदनशील व सुजाण मुसलमानाच्या सहजच लक्षात येऊ शकेल.

१) हजरत मोहम्मद पैगंबरांना सुर - ए - अलझिलझलचा उमगलेला आशयतच चुकीचा आहे. ('रूहानी सजाइन' - श्रीजालय - औहाम पृष्ठ १६६ - ६७).

२) कुराणशरीफ हा ग्रंथ माझ्या विधानांचा आणि सूचनांचा संग्रह आहे. (जाहिरात - १५ - ३ - २८९७)

३) पैगंबर हे खोटारडे असतात. (रूहानी खजाइन - इज आलए औहाम, पृष्ठ ४७२)

४) हजरत मोहम्मद पैगंबरांची प्रत्येक भविष्यवाणी खोटी ठरलेली आहे. (रूहानी खजाझ पुस्तक ३ रे पृष्ठ ४७२)

५) हजरत मेहदी अलैसलाम यांचे आगमन होणार नाही. (र. ख. पुस्तक ३ रे पृष्ठ ५७५)

६) इब्जे मरियम, दज्जा, लखरे दज्जाल याजुज, माजुज आणि दब्बातुल अर्ज यांच्याविषयी हजरत मोहम्मद पैगंबर यांना अंतर्ज्ञान झाले नव्हते. (र. ख. पु. ३ रे पृ. ४७३)

७) खरे दज्जाल ही एक आगगाडी आहे. दबातुल अर्ज हा एक मुसलमान विद्वान आहे. दज्जाल हा खिस्त पाद्री आहे. (रु. स. पु. ३ रे पृ. ३६५ - ६६)

८) हजरत इसा अलैसलाम हिप्नॉटिझमचे तज्ञ होते. (रू. ख. पु. ३ रे पृ. २५७).

९) हजरत इसा अलै सलाम हे युसूफ नज्जात यांची संतती होय. (रू. ख. पु. ३ रे पृ. २५४).

१०) येशू खिस्ताचे चारित्र्य कसे होते? तो अतिशय खादाड होता. तो ईश्वराचा सेवक नव्हता की भक्तही नव्हता. तो उर्मट, अहंकारी आणि ईश्वरत्वाचा दावा करणारा उद्दाम माणूस होता!

(मक्तुबाते अहमदीया पुस्तक ३ रे)

११) येशू खिस्ताचे कुटुंबही पवित्र आणि स्वच्छ नव्हते. त्याला तीन आज्या होत्या - त्या सर्व वारांगना होत्या - त्यांचाच तो एक वंशज होता! (रु. ख. पुस्तक ११ वे पृ. २९०)

१२) नवाहीन - ए - अहमदीया हा अल्लाहचा ग्रंथ आहे. (रु. ख. पु. ३ रे पृ. ३८६)

१३) पवित्र कुराणातील चमत्कृती हे मैस्मेरिझमचेच प्रकार आहेत. (रु. ख. पु. ३ रे पृ. ५०६)

१४) 'इन्न अनजलना करीबा मिनल कादियान' (हे नि:संदेह कादियानमध्ये व्यक्त झाले आहे.) ही उक्ती कुराणात ग्रथित आहे. (रु. ख. पु. ३ रे पृ. १४०)

१५) मक्का, मदीना आणि कादियान या शहरांच्या नावांचा कुराणात आदरपूर्वक उल्लेख आहे.

१६) बैतुल फिक्र (मिर्झा ज्या खोलीत बसत व लिहित) ही हरम-ए-काबा सारखीच पवित्र वास्तू आहे आणि जो कोणी या वास्तूत प्रवेश करतो त्याला शांती लाभते. (रू. ख. पु. १ ले-बरहीने अहमदीया-पृ. ६६६-६७)

१७) कुराणातील 'सुबहानुलजी बहद लैला मिनल मस्जिदुल हराम इल्लल मस्जिदुल अक्सा' या 'सुऱ्याचा' खरा अर्थ असा आहे की ही मशीद मिर्झा गुलाम अहमद कादियानाच्या वडिलांनी बांधली आहे. (जाहिरात-'मिनारतुल मसीह' या इमारतीच्या बांधकामासाठी देणगीचे आवाहन. जाहिरातींचा संग्रह पु. ३ रे पृ. २८६)

१८) हजरत मो. पैगंबर हे अल्लाहचे अखेरचे पैगंबर नाहीत. (रू. ख. पु. ३ रे पृ. ३२०)

१९) 'कयामा' (प्रलय काळ) हा प्रकार मुळी अस्तित्वातच नाही. प्राक्तन म्हणून काही एक नाही! (रू. ख. पु. ३ रे पृ. २ (टायटल पेज) पहिली आवृत्ती)

२०) पश्चिमेला सूर्य कधी उगवणार नाही! (उ. ख. पु. ३ रे पृ. ३७६)

२१) कबरीत कोठलीही शिक्षा होत नाही (रू. ख. पु. ३ रे पृ. ३१६)

२२) पुनर्जन्म ही वस्तुस्थिती आहे. (रू. ख. पु. १० वे पृ. २०८)

२३) पवित्र कुराण हे अपशब्दांनी भरलेले आहे.

२४) माझा असा दावा आहे की मीच तो प्रतिक्षित प्रेषित आहे-की ज्याच्याविषयी सर्व पवित्र ग्रंथात, तो अंतकाळात प्रकटणार असल्याचे म्हटले आहे! (रू. ख. पु. १७ वे पृ. २९५)

२५) मी आदम आहे. मी नोहा आहे. मी अब्राहम आहे. मी इसहाक आहे. मी याकूब आहे. मी इस्माईल आहे. मी मुसा आहे. मी मेरीचा पुत्र येशू ख्रिस्त आहे. मी हजरत मोहम्मद पैगंबर आहे. (रू. ख. पु. २२ वे पृ. ५२१)

२६) मी स्वनिर्मित आहे. स्वयंभू आहे. स्वसंगोपित आहे. मी ब्रिटिश सरकारचे एक रोपटे आहे. (रू. ख. पुस्तक १३ वे पृ. ३५०)

२७) लहानपणापासून आज वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत मी आपल्या वाणी व लेखणीचा उपयोग या महान कार्यासाठीच करीत आलो आहे. जेणेकरून मुसलमानाच्या मनात ब्रिटिश सरकारविषयी खरे प्रेम, सदिच्छा, सहानुभूती आणि आपुलकी यांसारख्या भावना निर्माण करू शकेन. तसेच मुसलमानांच्या मनातून 'जिहाद' सारख्या अर्थहीन श्रद्धेला नष्ट करू शकेन. (रू. ख. पुस्तक १३ वे पृष्ठ ३५०)

२८) ब्रिटिश सरकार खातर मी आजवर भारत आणि इतर देशामध्ये 'जिहाद' विरुद्ध ५०,००० पत्रके प्रकाशित करविली आहेत. परिणामी लाखो माणसांच्या मनातून 'जिहाद'च्या संकल्पनेला-श्रद्धेला दूर करण्यात बहुतांशी यशस्वी होऊ शकलो. (रू. ख. पु. १५ वे पृ. ११४)

२९) माझ्या आजवरील प्रकाशित साहित्यामुळे भारतात अगणित मुसलमान प्रभावित झाले आहेत. एवढेच नव्हे तर माझ्या खांद्याला खांदा लावून सदर विचारसरणीवर निष्ठा जडलेले अनेक जण माझ्या मागचे अनुसरणही करू लागले आहेत-त्यांनी 'जमाते अहमदिया' स्थापन केली आहे. हे सर्व अनुयायी ब्रिटिश सरकारचे कृतज्ञ आहेत...त्यांच्यासाठी प्रसंगी प्राणार्पण करण्यासही सिद्ध आहेत. (मिर्झाचे ब्रिटिश सरकारला पत्र-तबलिगे रिसालत पुस्तक ६ वे पृष्ठ ६६)

३०) याला अपवाद केवळ धंदेवाईक स्त्रियांच्या संततीचा. कारण त्यांची मने चक्क अल्लाहनेच सीलबंद केली आहेत. त्यांच्या व्यतिरिक्त अन्य सर्वांचीच माझ्या पैगंबरीवर (प्रेषित्वावर) श्रद्धा आहे. (रू. ख. पुस्तक ५ वे, 'आहन-ए-कमालाते इस्लाम' पृष्ठ ३४७)

३१) गुलाम अहमद कादयानीची अवज्ञा म्हणजे सरळ सरळ अल्लाहचीच अवज्ञा-हजरत मोहम्मद पैगंबराचीच अवज्ञा! परिणामी मरणोत्तर त्यांची रवानगी जहन्नुम (नरक) मध्येच होणार हे निश्चित! (मिर्झाची जाहिरात दि. २५ मे १९००)

## प्रिय मुस्लीम बांधवांनो!

तर ही अशी भयानक व प्रक्षोभक आहेत गुलाम अहमद कादियानीची श्रद्धास्थाने!....

आमची खात्री आहे की जगाच्या पाठीवर असा एकही मुसलमान शोधूनही सापडणार नाही की ज्याचे रक्त आपला प्रिय धर्म आणि प्रियतम पैगंबर यांच्याबाबत उपरोक्त बाष्फळ बडबड ऐकून वा बेंगरूळ लिखाण वाचून सळसळून उठणार नाही!

वस्तुत: कादियानीच्या उपरोक्त नरकप्राय: व दिशाभूल करणाऱ्या श्रद्धांशी खऱ्या मुसलमानाचा सुतरामही संबंध नाही. हे खरे आहे की प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या श्रद्धेप्रमाणे आपापल्या श्रद्धास्थानांचा वा दैवतांचा प्रचार व प्रसार करण्याचा पूर्ण हक्क व अधिकार जरूर आहे. मात्र इस्लामी श्रद्धा वा निष्ठा यांना पायाभूत बनवून स्वत:च्या सैतानी श्रद्धा व शिकवणींचे उदात्तीकरण करण्यासाठी इस्लामी मुलभूत तत्त्वप्रणालीचा विपर्यास करण्याची अनुमती आजवर कोणाही व्यक्तीला वा समूहाला देण्यात आलेली नाही व भविष्यातही दिली जाणार नाही!

इस्लामी श्रद्धा व शिकवणीत सुधारणेला मुळीच वाव नाही. तशा प्रकारच्या कोठलाही प्रयत्न हा सरळ सरळ 'कुफ्र' (इस्लाम विरोधी) आहे. गुलाम अहमद कादियानी आणि त्याचे अनुयायी तेच करीत आहेत आणि म्हणून ते सारे 'काफिर' आहेत! इस्लाममध्ये सुधारणा करीत असल्याचा आव आणून भोळ्याभाबड्या मुसलमानांची दिशाभूल करण्याचा त्यांना मुळीच हक्क पोहोचत नाही. त्यांची ही कृती म्हणजे सर्वसामान्य मुस्लीमांची फसवणूक करून, त्यांना धर्मापासून अलग करून काफिर बनवण्याचाच दुष्ट कट आहे!!

कादियांनीना आपल्या विक्षिप्त श्रद्धास्थानांचा प्रचार व प्रसार करावयाचा असेल तर त्यांनी तो खुशाल करावा परंतु त्यांना या पत्रकाद्वारे सक्त ताकीद देण्यात येत आहे की त्यासाठी त्यांनी इस्लामी श्रद्धा व निष्ठा यांना इस्लामविरोधी प्रचाराचा केंद्रबिंदू बनवू नये!!!

**अँटी अहेमदीया मुव्हमेंट**
**पुणा, इंडीया**